Vol II Issue XI Dec 2012

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.11,Dec. 2012
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# वाद्यवादन आणि मातंग समाज : एक अध्ययन

*संतोष एम. खंडारे*

सहाय्यक प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय,कारंजा (लाड) जि. वाशिम (महा.)

*सारांश :*

भारतीय समाज व्यवस्थेची धर्म व जातीवर आधारित वैशिश्टये लक्षात घेता एकंदरीत भारतीय समाज परिवर्तनाचा इतिहास मंद गतीचा राहीला आहे. परंतु 19 व्या शतकातील परिवर्तनाच्या प्रकियेने विविध घटकांचा परिणाम म्हणून भारतीय समाज व समाज व्यवस्था यांच्यात आम्रुलाग्रबदल होत आहेत. अनुसूचित जातींची प्रथम अंगीकृत यादी 1930 मध्ये प्रसिध्द करण्यात आली. व 1957 मध्ये त्यात सुधारणा करून पूर्ण प्रकाशित करण्यात आली. 1961 मध्ये च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात अनुसूचित जातीत एकूण 59 जातींचा समावेश होता. त्यापैकी अनुसूचित जातींच्या लोकसंख्येत महार जातींची लोकसंख्या 35.12 टक्के, मांग जातीची एकूण लोकसंख्या 32.65 टक्के आणि चांभार 22.06 टक्के तर इतर एकूण 56 जातींची लोकसंख्या अनुसूचित जातीच्या 10.04 इतकी होती. म्हणून लोकसंख्याच्या आधारे मातंग जातीचा अनुसूचित जाती गटात दुसरा क्रमांक लागतो.

### *प्रस्तावना :*

अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणार मातंग ही जात महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यामध्ये प्रामुख्याने आढळुन येते. पण मातंग जातीचे केंद्रीकरण मुख्यतः महाराष्ट्रात झालेले आहे.

आज मातंग समाजाच्या प्रत्येक व्यवसायाला धार्मिक व सांस्कृतिक महत्व पूर्वी सारखे राहिले नाही. बदलत्या परिस्थितीत मातंग समाजाच्या व्यवसायाचे स्वरूपही बदललेले आहे. पारंपारिक व्यवसायाचे महत्व कमी झाले आहे. नवतंत्र आलं ! नवे पर्याय आलेत परिणामी मातंग समाजातील व्यवसाय पोरके झालेत.

मातंग समाजाकडे वाद्य वाजविण्याची (वाद्यवादन) कला पिढीजात आहे. हे कला कौशल्य ते कोठे जाऊन अथवा कोणत्याही प्रकारे प्रशिक्षण न घेता अवगत करतात. मातंग समाजातील व्यक्तीला वाद्य वाजविण्याची कला अवगत असून सुध्दा त्यांच जीवन उपेक्षित, वंचित, अतिशय हलाकीचे का ? या समाजातील वाद्यवादक कलाकारांपूढे अनेक समस्या आहेत. ज्यामुळे त्यांच्या कौटूबिक स्थितीत सुधारणा घडून येण्यास अनेक अडथळे निर्माण होतात. म्हणून प्रस्तुत अध्ययनात अकोला जिल्ह्यातील मातंग समाजातील वाद्यवादक कलाकरांच्या सामाजिक समस्यांचा शोध घेण्याचा अल्पशा प्रयत्न केला आहे.

### *अध्ययनाची उद्दिश्टये :*

1.अकोला जिल्हातील मातंग समाजातील वाद्यवादकाच्या विविध समस्या जाणून घेणे.
2.वाद्यवादकांमध्ये असणाऱ्या विविध कलाकृतीचा शोध घेणे.
3.इतर समुदायातील कलाकारांच्या तुलनेत मातंग समाजातील वाद्यवादक कलाकरांना विकासाचा वेग समजून घेणे.
4.नवीन वाद्य व मार्गदर्शनासंबंधीची माहिती जाणून घेणे.
5.मातंग समाजातील वाद्यवादकांच्या कौटूंबिक स्थितीचा आढावा घेणे.

### *गृहितके :*

1.वाढत्या समस्यामुळे मातंग समाजातील वाद्यवादकापुढे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत आहे.
2.वंचित घटकांसाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत.
3.मातंग समाजात वाद्यवादकांसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षणाचा अभाव आहे.

### *अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा :*

अध्ययाच्या उद्देशांना केंद्रबिंदू मानून अकोला जिल्हयातील मातंग समाजातील वाद्यवादक कलाकारांच्या विविध समस्या जावून घेण्याच्या दृष्टीने अकोला जिल्हातील 15 गावांमध्ये 50 वाद्यवादक कलाकारांची निवड करून अध्ययन विषयाची भौगोलिक क्षेत्रासंबंधीची व्याप्ती अकोला जिल्हापुरती मर्यादित ठेवली होती.

***पध्दती :***

प्रस्तुत अध्ययनाकरीता प्राथमिक व दुयम स्त्रोताचा आधार घेण्यात आला.

(मुलाखत, निरीक्षण, विविध ग्रंथ, मासिके,दैनिके, वेबसाईटवरील लेख, विविध अहवाल इ. )

***विषय विवेचन :***

मातंग समाज अकोला जिल्हयातील ग्रामीण व नागरी भागात वास्तव्यास आहे. आजच्या औद्योगीकरण, विज्ञानाच्या विकासाने व प्रगतीने शहराच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थेला बदलुन टाकले आहे. खेडयांची रचना आणि संस्कृती ही शहाराची रचना आणि संस्कृती पेक्षा मुलतः भिन्न असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे त्या त्या ठिकाणच्या मानवी स्वभावामध्ये फरक पडत गेलेला असणे स्वाभाविक आहे. मात्र ग्रामीण भागातील वाद्यवादक नागरी भागात वाद्य वाजविण्यासाठी हंगामी स्वरूपाचा व्यवसाय करतांना दिसतात.

***मातंग :–***

मातंग जातीची उत्पती केव्हा व कशी झाली हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. पण या संदर्भात काही दंतकथा असल्यातरी विचारवंतामध्ये व संशोधकामध्ये मतभिन्नता दिसुन येते. मातंग लोक शत्रुपक्षावर शस्त्राशिवाय चढाई करण्यात निपुण होते. जसे मात + अंग = मातंग. मात म्हणजे चढाई, अंग म्हणजे अंगात सर्व शक्ती असलेला असा होय. मांग जातीचा उल्लेख श्री बसवेश्वर, लिलाचरित्र, गोविंदप्रभु चरित्र, यादव कालीन महाराष्ट्र, तुकारामाची गाथा, इ. मध्ये आढळ्तो. मातंग समाज जंबऋशीला आपला पूर्वज मानतात. अर्थात मांग जातीचा मुळ पुरूष हा ऋशी होता. त्यामुळे हा समाज पूर्वी वन्य भागात राहत असावा. महाराष्ट्रात मातंग समाजात काही पोटजाती आहेत. आज या उपजातीमध्ये विवाहाच्या संदर्भात काही बंधने सेल होत आहेत. डॉ. इरावती कर्वे यांनी गाव तेथे मांगवाडा या शब्दात मातंग जातीची सार्वत्रिकता कथन केलेली आहे. त्यांच्या मते . मातंग म्हणजे अंत्येवासी, गावाच्या शेवटी राहणारे, शुद्रातील खालचे लोक, शब्दकोशात . मातंग म्हणजे खालच्या जातीचा मनुष्य, चांडाल, किरात, असा अर्थ दिला आहे.

मातंग जातीमध्ये प्रादेशिक, धर्मपंथ, शुध्द अशुध्दतेच्या, व्यवसायाच्या आधारे उपजाती पडल्यात. [3]परंपरेने चालत आलेल्या कृशीजीवनात आणि गावाच्या सांस्कृतिक जीवनात मातंग समाजाची महत्वपूर्व भूमिका राहली आहे[4]. मातंग समाज हिन्दू धर्मीय समाज आहे. हिन्दूंचे सणवार आणि देवदेतांचा तो उपासक आहे. फार पूर्वी मांग ही राज्यकर्ती जमात होती. पूर्वश्रमी महारांच्याही आधीचा मांग या भूमिचा पुत्र आहे. युध्दात पराभव झाल्यामुळे त्यांच्या नशिबी जितांचे जिणे आहे व ते गुलाम बनले[5].

***वाद्य :***

संगीत ध्वनी निर्माण करण्याचे साधन म्हणजे वाद्य. कोणत्याही वाद्याला दोन भाग असतात.

1.कंपित्र – ज्याच्या कंपनाने ध्वनी उत्पन्न होतो.
2.सहकंपक – निर्मित ध्वनी वाढवितो आणि पसरवितो. वाद्यांची निर्मीती मानवी संस्कृती इतकीच प्राचीन आहे.

***वाद्यांचे वर्गीकरण –***

अवनध्द – कातडयांचे मढविलेली व हातांनी किंवा काडयांनी वाजविण्याची वाद्ये.
सुशिर – फुंकून किंवा हवेचा प्रवाह सोडून वाजविण्याची वाद्ये.
घन – ध्वनी उत्पादक धनवस्तु एकमेकांवर आढळुन वाजविण्याची वाद्ये.
तंतु – तारा छेडून वा गाजाने वाजविण्याचे वाद्य.

काळाच्या ओघात हयांच्या स्वरूपामध्ये फरक पडत चालला आहे. भारतात आधुनिक व पारंपारिक वाद्यांना एकत्रित करून वाजविण्याची प्रथा 1900 व्या शतकापासुन सुरू झाली.

1. नाटयसंगीत
2. बॅन्ड वादन
3. चित्रपट संगीत

वरील तीन स्त्रोतांपैकी महाराश्ट्रातील मातंग समाज हा बहुसंख्येने दुसऱ्या क्षेत्रात म्हणजे बॅन्ड वादन या क्षेत्राशी संबंधीत असून मातंग समाजाची बॅन्ड वादन किंवा वाजंत्री वादन हया उपजीवीकेचे साधन बनलेले आहे.

***वाजत्री :***

विशिष्ट प्रसंगी केले जाणारे सामुहिक वाद्यवादन किंवा विशिष्ट प्रसंगी वाद्यवादन करणारे वादक.
हर्शचरित्रामध्ये सैनिकांच्या प्रयाणाच्यावेळी गुंजा नामक समरवाद्ये समुहाने वाजविणाऱ्या वाजत्र्यांचा उल्लेख सापडतो.
आजही काही जाती–जमातीमधील वाजंत्री मंडळी आपल्या जुन्या कर्तुत्वाचा सांगतिक वारसा जोपासतांना दिसतात.

***बॅन्ड –***

बॅन्ड या कल्पनेचा उगम युरोपातील असून पाश्चत्यांच्या आगमनाबरोबर भारतात आला. रशियाचे फ्रिद्रिख द ग्रेट यांना आधुनिक बॅडचे प्रवर्तक मानले जाते. त्यांनी 1763 मध्ये सैनिकी बॅन्डीची स्थापना केली व त्यात वाजावयाची वाद्य, त्याची संख्या इ. तपशील ठरवून दिला.

त्यानंतर त्यात अनेकांनी मौलिक बदल केले. बॅन्ड हा मुख्यतः सैनिक, पोलीस आणि त्याच्याप्रमाणे सांघिक, संचलने करणाऱ्या नागरी संघटना यांना अत्यंत उपयुक्त असतो.

***मातंग–वाद्यवादन :***

वाद्यवादक कलाकार हा प्रत्येक समाजामध्ये आढळून येतो. कारण प्रत्येक समाजामध्ये किंवा समुहामध्ये कोणत्याना कोणत्या प्रकारची वाद्यवाजविण्याची कला पाहावयास मिळतो. पण इतर समुह किंवा समाजातील बहुतांशी वाद्यवादक हे आपल्या छंद, व्यवसाय, प्रतिष्ठा अशा कारणामुळे वाजवितात मात्र मातंग समाजातील प्रत्येक वाद्यवादक हा आपल्या कुटूंबाच्या उपजिविकाकरिता वाद्य वाजवितो. इतर समाजातील वाद्यवादकांच्या तुलनेत मातंग समाजातील वाद्यवादकांचे प्रश्न वेगवेगळया पध्दतीचे आहेत. हलाखीची परिस्थिती, अज्ञान यामुळे मिळेल त्या प्रसंगी मातंग समाजातील वाद्यवादक वाद्य वाजविण्यास तयार असतात. उपजिवीकेचे साधन म्हणून मातंग वाद्यवादनाचा संबंध आहे.

***विश्लेषण व अन्वयार्थ :–***

प्रस्तुत अध्ययनाकरीता अकोला जिल्हयातील मातंग समाजातील 50 वाद्यवादक कलाकारांची नमुना म्हणून निवड करण्यात आली होती.

### वाद्य वादकांचा मुख्य व्यवसाय द र्षक को ष्टक क्र. 1

| व्यवसाय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| वाजंत्री | 45 | 90 |
| शेतमजूरी | 05 | 10 |
| नोकरी | 00 | 00 |
| शेती | 00 | 00 |
| इतर | 00 | 00 |
| एकुण | 50 | 100 |

वाद्यवादक कलाकारांचा मुख्य व्यवसाय वाजंत्री असणाऱ्याचे प्रमाण 90 टक्के इतके असुन शेतमजूरी करणाऱ्याचे प्रमाण 10 टक्के इतके होते. वाजंत्री हा व्यवसाय हंगामी स्वरूपाचा असल्याने त्यांना कौटूंबिक उदरनिर्वाहाकरीता अनेक समस्या निर्माण होतात.

### वाद्यवादकां च्या ि षक्षणाबाबत स्थितीद र्षक को ष्टक क्र. 2

| शिक्षण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अशिक्षित | 32 | 64 |
| 4 थी पर्यंत | 17 | 34 |
| 10 वी पर्यंत | 01 | 02 |
| पदवी पर्यंत | 00 | 00 |
| पदव्युत्तर | 00 | 00 |
| एकुण | 50 | 100 |

मातंग समाजातील वाद्यवादक कलाकारांच्या शिक्षणाविशयक स्थितीचा आढावा घेतल्यास अशिक्षित असणाऱ्यांचे प्रमाण 64 टक्के

तर 4 थी पर्यंत शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण 34 टक्के इतके होते. अर्थात हे प्रमाण नगण्य स्वरूपाचे आहे.

वाद्यवादकांच्या वादनाचा प्रकार द र्षक कोष्टक क. 3

| वादनाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| अवनध्द | 34 | 68 |
| सुपिर | 15 | 30 |
| घन | 00 | 00 |
| तंतु | 01 | 02 |
| एकूण | 50 | 100 |

वाद्यवादक कलाकारांपैकी अवनध्द वाद्ये वाजविणाऱ्याचे प्रमाण 68 टक्के इतके असून तंतू वाद्ये वाजविणाऱ्याचे प्रमाण शुन्य आहे.

***समस्या :***

प्रस्तुत अध्ययनांती निदर्शनास आलेल्या समस्या पुढीलप्रमाणे

1.मातंग समाजातील वाद्यवादक कलाकारांना नविन अथवा आधुनिक वाद्यांची ओळख नाही.
2.स्वर, ताल, लय, या विशयी माहितीचा अभाव असून जाणीव जागृती नाही.
3.प्रशिक्षण, मार्गदर्शनाचा अभाव.
4.अज्ञानामुळे आरोग्याची काळजी घेतली जात नाही.
5.वाद्यवादकांमध्ये दारिद्रयाची समस्या जाणवते.

***शिफारशी***
:
मातंग समाजातील वाद्यवादकांसाठी शासनस्तरावरून विशेश बाब म्हणुन काही तरतुदी कराव्यात म्हणून काही शिफारशी सुचवित आहोत.

1.मातंग समाजातील वाद्यवादक कलाकरांची अथवा बॅंड व्यवसायीकांची विशेष नोंदणी व्हावी.
2.वाद्यवादन क्षेत्रात नवनवीन वाद्ये बाजारात येत आहेत. ती सवलतीच्या दराने उपलब्ध करून देण्यात यावीत.
3.मातंग समाजातील वाद्यवादकांना शासनाकडुन स्वतंत्र्य ओळखपत्र देऊन त्यांच्या आरोग्याची वारंवार विनामुल्य तपासणी करण्यात यावी.
4.मातंग समाजातील वाद्यवादकांना विविध संगीत ॲकेडमीमध्ये विनामुल्य प्रवेश देण्यात यावा.

***निष्कर्ष :***

1.मातंग समाजातील वाद्यवादक दारिद्रय रेशेखाली जीवन जगत असणाऱ्याचे प्रमाण अधिक आहे.
2.मातंग समाजातील वाद्यवादक कलाकारांमध्ये अशिक्षित असणाऱ्याचे प्रमाण अधिक आहे.
3.प्रशिक्षण घेऊन वाद्य वाजविणाऱ्याचे प्रमाण शुन्य आहे.
4.अवनध्द व सुशिर वाद्ये वाजविणाऱ्याचे प्रमाण अधिक आहे.
5.वाद्यवादन व्यवसाय हंगामी स्वरूपाचा असल्याने अनेक समस्या उद्‌भवतात.
6.सतत वाद्ये वाजविल्यामुळे थकवा येतो आणि थकवा घालविण्यासाठी मद्यपान घेतो प्रमाण अधिक आहे.

***सारांश :***

कोणत्याही राष्ट्राची उंची ही तेथील विचारवंत, संशोधक, नेतृत्व व कलावंतावर अवलंबून असते. आज बहुतांशी पालकांचा ओढा हा आपल्या मुलाला डॉक्टर किंवा इंजिनिअर बनविण्याकडे आहे. परंतु धकाधकीच्या स्पर्धेच्या युगामध्ये मानवी जीवन तणावपूर्ण परिस्थितीवर मात करण्यासाठी आज संगीत मानवी जीवनाचे अविभाज्य अंग बनत चालले आहे. एकीकडे करमणुकीचे साधन असले तर दुसरीकडे उपजिवीकेची साधनसुध्दा आहे. म्हणून ज्यांना वाद्यवादन कलेची नैसर्गिक देणगी मिळालेली आहे. त्यांना उत्तम कलावंत बनविण्यास प्रवृत्त केल्यास राश्ट्राला, समाजाला आवश्यक कलावंत मिळतील.

***संदर्भसुची :***

1.डॉ. अर्जुने दिलीप – मातंग समाज स्थिती आणि गती – प्राचार्य डॉ. अग्रवाल पुस्तक समिती, जालना
2.डॉ. मिसाळ हनुमंत – महाराष्ट्रातील दलीतांचे अंतरंग – कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
3.सोमवंशी बी. बी. – भारतीय जाती संस्थेत मातंगाचे स्थान महार मांग संबंध आनंद प्रकाशन, औरंगाबाद.
4.मांडे प्रभाकर – मांग आणि त्यांचे मांगते – गोदावरी प्रकाशन – औरंगाबाद.
5.वानखडे चंद्रकांत – मातंग प्राचिनता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा – सुगावा प्रकाशन पुणे.
6.मराठी विश्वकोश – खंड 15 / 1200.
7.मराठी विश्वकोश – खंड 11 / 207.
8.प्रा. जगदाळे संदिप – स्वरगंध – शुभम प्रकाशन, लातुर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net